दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2024-2026
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● सोमवार दि.१० फेब्रुवारी २०२५ ● पाने ४ ● वर्ष ४० ● अंक ४४० ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

# कुदळवाडीतील कारवाईमुळे हजारो संसार रस्त्यावर; लघु उद्योजकांवर मोठे संकट

## अतिक्रमणावरील कारवाईचे फोटो आणि व्हीडीओ देशभरात व्हायरल होऊ नये, म्हणून इंटरनेट सेवा पहाटेपासून बंद ठेवून कारवाई

**पुणे । वृत्तसंस्था**

नागरिकांचा रोष आणि विशिष्ट समाजामध्ये तेढ निर्माण होऊ नये, यासाठी अतिक्रमणविरोधी कारवाई करताना विशेष काळजी घेण्यात आली होती. अतिक्रमणावरील कारवाईचे फोटो आणि व्हीडीओ देशभरात व्हायरल होऊ नये, म्हणून इंटरनेट सेवा पहाटेपासून बंद ठेवून कारवाई करण्यात आली. यावेळी पोलीस आयुक्त स्वतः मोठ्या फौजफाट्यासह घटनास्थळी थांबून होते. कुदळवाडी भागात जाणाऱ्या रस्त्यावरील वाहतूक टप्प्याटप्प्याने अन्य मार्गाने वळविण्यात आली होती. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अतिरिक्त आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त संदीप डोईफोडे, स्वप्ना गोरे, विशाल गायकवाड, डॉ. शिवाजी पवार, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांच्यासह १०० अधिकारी, ३०० स्थानिक कर्मचारी, राज्य राखीव दलाचे ३०० जवान असा फौजफाटा शनिवारी पहाटे पाच वाजल्यापासून तैनात करण्यात आला होता. परिसरातील रहिवासी नागरिकांच्या घरावर, कारवाईचा रोष व्यक्त होऊ नये, यासाठी काही सोसायटीच्या गेटवर पोलीस तैनात करण्यात आले होते. अतिक्रमण निर्मूलन विभाग, अग्निशमन विभाग, आपत्कालीन व्यवस्थापन विभाग आदींसह संबंधित विभागांना महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मध्यरात्री करून, सकाळी सहा वाजता कारवाईसाठी उपस्थित राहण्याबाबत आदेश दिले होते. शुक्रवारी रात्रीपर्यंत या कारवाईची कुणकुण अन्य कोणाला लागू नये, यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली होती.





३० जानेवारी रोजी कारवाई करण्यासाठी महापालिकेचे अधिकारी ठराविक पोलिसांसह घटनास्थळी दाखल झाले होते. मात्र, स्थानिक नागरिक, व्यावसायिक आणि शहरातील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी घटनास्थळी जाऊन रास्ता रोको आंदोलन करीत कारवाईला विरोध केला होता. हे आंदोलन दुसऱ्या दिवशीदेखील सुरू राहिल्याने महानगरपालिकेचे अधिकारी आणि पथक कारवाई न करताच परतले होते. त्यांनतर शनिवारी पहाटेपासून कारवाईचे नियोजन करण्यात आले होते. सायंकाळी उशिरापर्यंत ही कारवाई सुरू होती.

**कामगारांची गावाकडे परतण्यास सुरुवात**

महापालिकेने अतिक्रमण कारवाई करताना येथील लघु उद्योजकांच्या पन्नासहून अधिक छोट्या कारखान्यांवर (शेड) कारवाई केली. काही कोटी रुपयांचे नुकसान या कारवाईमुळे झाले आहे. अनेक कारखान्यांमध्ये वर्कशॉप मध्ये कोट्यवधींची मशिनरी, तयार करण्यात आलेले पार्ट या कारवाईमुळे खराब झाले. १५ ते २० हजार लोकांच्या रोजगारावर या कारवाईचा परिणाम होणार आहे. कारवाई सुरू झाल्यानंतर अनेक कामगारांनी बॅग भरून गावाकडे परतण्यास सुरुवात केली आहे. अनेकांची मुले या भागात शिक्षण घेत असून, या कारवाईमुळे आता राहायचं कुठं आणि शिक्षण, रोजगार याचे पुढे काय, असा प्रश्न येथील हातावर पोट असणाऱ्यांना पडला आहे. कामगारांमध्ये महाराष्ट्रासह इतर राज्यांतील नागरिकांचादेखील समावेश आहे.

**हुकूमशाहीविरुद्ध रस्त्यावर उतरणार**

प्रदूषण करणारे, घातक कचरा जाळणारे, अवैध भंगार व्यावसायिकांवर कारवाई करण्यास आमचा विरोध नव्हता. मात्र, मागील तीस वर्षांपासून सर्व प्रकारचे टॅक्स भरून लघु उद्योजक व्यवसाय करीत होते. हा परिसर ग्राम पंचायतीमध्ये असताना लोकांनी व्यवसाय सुरू केले होते. लाईट मीटर, पाणी मीटर, अग्निशमन ना हरकत घेऊन हे व्यवसाय सुरू आहेत. महापालिकेत हा भाग समाविष्ट झाल्यावर २०१२ पूर्वीची बांधकामे दंड भरून नियमित करण्यात आली होती. मग आता ३० वर्षांनंतर आम्ही अनधिकृत हा जावईशोध कोणी लावला? आयुक्तांच्या आडून कारवाई कोण करत आहे, हे शहरातील नागरिकांना समजायला हवे. हजारो लोकांचा रोजगार या कारवाईमुळे बुडणार आहे. आम्हाला आता कामगारांसह रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. राजकीय हेतूने प्रेरित कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, यासाठी लढा देणार आहोत, असे पिंपरी-चिंचवड लघु उद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी सांगितले.

पान ३ वर...

## थोडक्यात



### बॉक्साईट युक्त मातीची गोव्यात चोरटी वाहतूक

**मळेवाड । वार्ताहर**

बॉक्साईटचा अंश असलेले चिरेयुक्त माती आणि दगड युक्त चोरटी वाहतूक काही अज्ञाताकडुन केली जात आहे. हा प्रकार मळेवाड-आजगाव परिसरात सुरू आहे. दरम्यान यामागे महसुलच्या अधिकार्यांचा हात असून या प्रकारामागे मोठे रॅकेट असल्याचा आरोप करीत या प्रकाराची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी तेथील स्थानिक ग्रामस्थांकडुन करण्यात आली आहे. आजगाव-मळेवाड येथे महसुलची परवागनी घेवून चिरे काढले जातात. परंतू त्या ठिकाणी चिरे काढण्यापुर्वी काढण्यात आलेल्या माती दगडात बॉक्साईटचा अंश असल्याचे आढळून आल्या मुळे या मातीयुक्त दगडाची चोरटी वाहतूक केली जात आहे. त्यासाठी बोगस पासची जुळवाजुळव केली जात असल्याची माहिती तेथील ग्रामस्थांकडुन देण्यात आली असून गोव्याच्या सिमेवर असलेल्या एका गावात पाचशे डंपरहून अधिक गाड्याचा साठा करण्यात आल्या असून त्या कर्नाटक हॉस्पेट येथे पाठविण्याच्या हालचाली सुरू आहेत, असे ग्राामस्थांचे म्हणणे असून या प्रकाराची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडुन करण्यात आली आहे.

### सहा गुरांसह टेम्पो मिळून ६ लाखाचा मुद्देमाल जप्त

**सांगेली । वार्ताहर**

कत्तलीसाठी गुरांची वाहतूक केल्याप्रकरणी सावंतवाडी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई आज सकाळी ११ वाजता सांगेली-सावरवाड येथे करण्यात आली. यात ६ गुरांसह बॉलेरो टेम्पो असा ६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकनाथ यशवंत म्हाडगुत (वय ५४, रा.सावरवाड) आणि हालेट धाकटू फर्नांडिस (वय ५०, रा.खडगे-आजरा) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत. ही कारवाई पोलिस हवालदार संतोष गलोले आणि प्रसाद कदम यांनी केली. त्यांना ताब्यात घेवून नोटीस देवून सोडुन देण्यात आले. गाडीतून वाहतूक होत असल्याची माहिती तेथील काही स्थानिक ग्रामस्थांकडुन देण्यात आली होती. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली.

### झरेबांबर येथे उद्या श्री विश्वकर्मा प्रकटदिन उत्सव

**दोडामार्ग । वार्ताहर**

श्री विश्वकर्मा सुतार शिल्पकार समाज मंडळ दोडामार्ग च्यावतीने प्रतिवार्षिक मिती माघ शु.१३ शके १९४६ सोमवार दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी श्री विश्वकर्मा प्रकटदिन उत्सव आयोजित करण्यात आलेला आहे.

## झारापमधील पर्यटकांवरील हल्ल्याच्या प्रकरणी सकल हिंदू समाज आक्रमक

**कुडाळ । वार्ताहर**

सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा आहे. अशा शुल्लक कारणावरून जर पर्यटकांना मारहाण होत असेल, तर ती या पर्यटन जिल्ह्याची बदनामी आहे. असे कृत्य पुन्हा घडू नये आणि कायद्याचा धाक राहावा, यासाठी या मारहाण करणार्या व्यक्तीचा स्टॉल कायमस्वरूपी बंद करावा. यापुढे अशा प्रकारची घटना घडल्यास, असा इशारा सकल हिंदू समाजाच्या नेत्यांनी कुडाळ पोलिस निरीक्षक राजेंद्र मगदूम यांची भेट घेऊन दिला. शुक्रवारी सायंकाळ या मागणीचे निवेदन पोलिस प्रशासनाला देण्यात आले. झाराप येथे पर्यटकाला चहा बदलून देण्याच्या विषयावरून मारहाण झाली होती. या घटनेनंतर पोलिसांनी संबंधितांची तक्रार नसताना स्वतः फिर्यादी होऊन तक्रार दाखल करत सहा जणांवर गुन्हे दाखल केले. या घटनेचे पडसाद कुडाळात शुक्रवारी



पान ३ वर...

## अपात्र पुस्तकाला पुरस्कार; साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या वतीने नुकतेच स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार जाहीर करण्यात आले. मात्र, या पुरस्कारांमध्ये अपात्र पुस्तकाची निवड झाल्याचा गंभीर आरोप होत असून, साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**अपात्र पुस्तकाची निवड कशी झाली?**

या पुरस्कारांतर्गत 'प्रौढ वाङ्मय कादंबरी' या गटासाठी 'हरि नारायण आपटे पुरस्कार' हा 'दस्तावेज' या कादंबरीस देण्यात आला. मात्र, नियमांनुसार १ जानेवारी २०२३ ते ३१ जानेवारी २०२३ या कालावधीत प्रकाशित झालेले पुस्तकच ग्राह्य धरले जाणे आवश्यक होते. मात्र, या कादंबरीच्या छापील प्रतीवर प्रकाशन दिनांक स्पष्टपणे नमूद नाही. एवढेच नव्हे, तर प्रकाशनाची तारीख असावी या नियमानुसार आवश्यक असताना, फक्त 'पहिली आवृत्ती हक्कः २०२२' असे छापले गेले. विशेष म्हणजे, मूळतः २०२२ साल दाखवण्यासाठी छापलेल्या मजकुरावर २०२३ चे स्टीकर लावून ही माहिती बदलण्यात आली. याचा अर्थ पुस्तक नेमके केव्हा प्रकाशित झाले, याचा कोणताही ठोस पुरावा नाही.

**पुरस्कार प्रक्रियेत निष्काळजीपणा?**

पुरस्कारासाठी पात्र पुस्तकांची निवड करताना साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशन दिनांक पडताळणी करणे आवश्यक असते. मात्र, असे न करता मंडळाने सदर पुस्तक थेट समीक्षकांकडे पाठवले. हे घडणे म्हणजे मंडळाच्या कार्यपद्धतीतील मोठी त्रुटी असून, त्यामागे कोणाच्यातरी वैयक्तिक फायद्याचा हेतू असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**नियम डावलून निर्णय घेतला?**

पान ३ वर...

## लवकरच साळवी हाती घेणार धनुष्यबाण; पक्षप्रवेश निश्चित

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सत्ताधीर पक्षांमध्ये इनकमिंग सुरु आहे. दरम्यान, ठाकरे गटात नाराज असलेले माजी आमदार राजन साळवी लवकरच धनुष्यबाण हाती घेणार असून त्यांच्या पक्षप्रवेश निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजन साळवी येत्या १३ लतारखेला शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, या तारखेसंदर्भात अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.


काही दिवसांपूर्वी साळवी भाजपमध्ये जाणार असल्याची चर्चा रंगली होती. इतकेच काय तर साळवींचा हा निर्णय पक्का झाला होता. पक्षप्रवेशासंदर्भात भाजपनेत्यांसोबत चर्चादेखील त्यांची झाली होती. मात्र

पान ३ वर...

## कशेडी घाटातील दुसऱ्या बोगद्यातील वाहतुकीसाठी पुन्हा १५ दिवसांची मुदत

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

मुंबई - गोवा महामार्गावरील कशेडीच्या दोन्ही बोगद्यांतील वाहतूक पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचा प्रजासत्ताकदिनाचा मुहूर्त हुकल्याने सार्याचा हिरमोड झाला आहे. दुसर्या बोगद्यात १० पंखे बसवण्यात येणार आहेत. यातील ४ पंखे बसवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पंखे बसवण्याच्या कामासाठी आणखी १५ दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. ही कामे झाल्यानंतर 'ट्रायल' घेतल्यानंतरच दुसऱ्या बोगद्यातून पूर्ण क्षमतेने वाहतूक सुरू होईल, असे राष्ट्रीय महामार्ग खात्याकडून सांगण्यात आले. कशेडीच्या दोन्ही बोगद्यातील वाहतूक खुली झाल्यानंतर वाहनालकांचा प्रवास सुसाट अन् आरामदायी



पान ३ वर...

## सोन्या चांदीचे चोर पाहिले, मतांचे चोर पहिल्यांदाच पाहिलेत- बच्चू कडू

**छत्रपती संभाजीनगर**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपानं मोठा विजय मिळवलाय. तर सत्ताधारी आम आदमी पार्टीची पिछेहाट झाली. पण भाजपाच्या या विजयावर आता विरोधकांडून टीका होत असल्याचं बघायला मिळतंय.



असं असतानाच आता प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी भाजपावर हल्लाबोल केलाय.

यासंदर्भात प्रसार माध्यमांशी बोलताना बच्चू कडू म्हणाले की, देशभरात निवडणुकांबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. मतांची चोरी झाली का? डाकेखोरी झाली का? हे सर्व नीट तपासलं पाहिजे. जर खरंच मतांची चोरी झाली असेल, तर त्याचा शोध लागायलाच हवा. आमचं म्हणणं अगदी साधं आहे - ईव्हीएम मशीन राहू द्या, पण व्हीव्हीपॅडमध्ये मतदाराची सही यावी आणि मतपेटीत शिक्कासह मत पडावं. जर भाजप म्हणत असेल की विकासावर मत मिळतं, तर मग या मागणीला विरोध का? भाजपला जर खरंच जनतेचा पाठिंबा आहे, तर व्हीव्हीपॅडवर मतदाराची सही येण्याला अडचण असायचं कारण नाही.

भाजपचं आधीचं म्हणणं होतं की ईव्हीएम बंद करायला हवी, पण आता तेच ईव्हीएमच्या बाजूने बोलतात. मग काँग्रेसच्या काळात मशीन चुकीचं होतं आणि भाजपच्या काळात बरोबर आहे का? ही दुटप्पी भूमिका जनतेच्या मनात संशय निर्माण करणारी आहे.

दिल्लीसह देशभरात अनेक ठिकाणी ईव्हीएमविषयी संशय निर्माण झालाय. लोकसभा निवडणुकीत भाजपा विरोधात

पान ३ वर...

## साखरी नाटे बंदराचे काम सुरू; रत्नागिरीला मिळणार दुसरे मोठे बंदर

**राजापूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील साखरे नाटे येथे मत्स्य बंदर व्हावे अशी अनेक वर्षांपासूनची मागणी इथल्या मच्छीमार बांधवांची होती. सदर मागणी मान्य होऊन शासनाने नाबार्ड अंतर्गत सुमारे ११८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून साखरी नाटे जेटीला मान्यता दिली आहे. आता या जेटीचे काम सुरू झाले असून विविध सुविधांनी सुसज्ज अशी ही जेटी होणार असून यामुळे तालुक्यातील आणि साखरे नाटे भागातील मत्स्य व्यवसायाला एक नवसंजीवनी मिळणार आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील दोन नंबरचे बंदर म्हणून साखरी नाटे गावाची ओळख आहे. पर्ससीननेट मच्छीमारी सह, पारंपारिक पद्धतीने सुद्धा या भागामध्ये मासेमारी केली जाते. इथला मच्छीमारांना आणि मच्छी विक्रेत्यांना सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि मासेमारी चा व्यवसाय चांगल्या पद्धतीने व्हावा याकरिता धाऊलवल्ली - साखरी नाटे - आंबोळगड या संपूर्ण सागरी पट्ट्यामध्ये भव्य अशी मच्छिमार जेटी म्हणजेच बंदर मोठ्या स्वरूपामध्ये मंजूर करण्यात आले आहे. या जेटीचे डिझाईन मत्स्य विभागाने केले असून, जेटीच्या कामाची एकझिक्यूशनची जबाबदारी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे देण्यात आली आहे. जेटी करता आवश्यक असलेली सीआरझेड ची मान्यता देखील मिळालेली आहे. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी या बंदराच्या कामाला सुरुवात झाली. प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार साखरी नाटे येथील नियोजित बंदराच्या कामांमध्ये मच्छी मारांसाठी जाळे विणण्यासाठी शेड, संरक्षक भिंत, स्लीपिंग सॉफ्ट, बीच लँडिंग, मासळी लिलाव गृह, मत्स्य नौका दुरुस्तीसाठी लागणारी गियर शेड, प्रशासकिय इमारत, उपाहार गृह, विश्रांती गृह, बोट दुरुस्तीसाठी कव्हर शेड, रेडिओ कम्युनिकेशन सेंटर,

पान ३ वर...

सिंधुदुर्ग समाचार

दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg.samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com

सिंधुदुर्ग समाचार
॥ बुडती हे जण न देखवे डोळा! ॥

# महाकुंभातील श्रद्धेच्या महासागरात जीवांची आहुती!

मौनी अमावस्येच्या महान उत्सवात महाकुंभात शेवटी ज्याची भीती होती तेच घडले. प्रचंड गर्दीच्या या धार्मिक मेळाव्यात अनेक भाविकांनी आपले प्राण गमावले आणि अनेकजण गंभीर जखमी झाले. हे दृश्य अत्यंत हृदयद्रावक होते. अशी दुःखद घटना घडल्याने संपूर्ण देश हळहळला, मात्र हा अपघात टाळता आला असता का, हा मोठा प्रश्न आहे. मानवी चूक आणि गर्दी नियंत्रणाच्या अपयशामुळे हा अपघात घडल्याचे स्पष्ट होते. सरकारने महाकुंभाच्या व्यवस्थापनाचे श्रेय घेतले, पण आता या अपघाताची जबाबदारीही त्यांनाच स्वीकारावी लागेल. प्रशासकीय यंत्रणेतील हलगर्जीपणा मुळेच इतक्या मोठ्या प्रमाणावर हा अपघात घडला. मात्र, धार्मिक कार्यक्रमांमध्ये मोठी गर्दी जमवण्याच्या स्पर्धेमुळेही अशा दुर्घटना घडतात. जितकी अधिक गर्दी तितकाच त्या कार्यक्रमाचा प्रभाव आणि महत्त्व वाढल्याचे मानले जाते. म्हणूनच अशा मेळाव्यांमध्ये गर्दीचे व्यवस्थापन करताना अधिक खबरदारी घेणे आवश्यक असते.

महाकुंभात चेंगराचेंगरी होण्याचा इतिहास जुना आहे. १८४०, १९०६, १९५४, १९८६, २००३, २०१० आणि २०१३ या वर्षीही अशाच प्रकारच्या घटना घडल्या आहेत. १९५४ च्या अलाहाबाद महाकुंभात झालेल्या चेंगराचेंगरीत मृतांचा आकडा स्पष्ट नाही. काही अहवालांनुसार ३५० जणांचा मृत्यू झाला, तर काही अहवाल हा आकडा ८०० पर्यंत सांगतात. हे कुंभमेळ्याच्या इतिहासातील सर्वात मोठे अपघातांपैकी एक मानले जाते. २०१० मध्ये हरिद्वार येथे झालेल्या कुंभमेळ्यातही चेंगराचेंगरी झाली होती. सरकारने फक्त ७ लोकांचा मृत्यू झाल्याचा अहवाल दिला, पण नंतर गंगा नदीच्या बंधाऱ्यावर अनेक मृतदेह अडकलेले आढळले.

यंदाच्या महाकुंभातील दुर्घटनेच्या कारणांची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनीही स्पष्ट केले आहे की, अपघाताचे खरे कारण ही अनियंत्रित गर्दी होती. यापूर्वी सरकारने मोठ्या संख्येने लोकांच्या उपस्थितीचा प्रचार केला होता. सरकारी आकडेवारीनुसार, ४५ कोटीहून अधिक लोक महाकुंभात सहभागी होतील, अशी अपेक्षा होती. इतक्या मोठ्या गर्दीच्या व्यवस्थापनासाठी सरकारला अधिक नियोजन करणे आवश्यक होते. मात्र, नियोजनातील त्रुटींमुळे परिस्थिती हाताबाहेर गेली आणि दुर्दैवी घटना घडली. उत्तर प्रदेश सरकारने मोठ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर तयारी केली होती. मेळ्याचे क्षेत्र ४० चौरस किलोमीटर पर्यंत वाढवण्यात आले होते आणि ते २५ वेगवेगळ्या विभागांमध्ये विभागले होते. प्रत्येक विभागात गृहनिर्माण, रस्ते, वीज, पाणीपुरवठा आणि दळणवळण टॉवर आदी सुविधा पुरविण्यात आल्या. पण जत्रेचा परिसर कितीही वाढवला तरी गंगा नदीच्या किनाऱ्याची लांबी मर्यादित असल्याने काही प्रमुख घाटांवर प्रचंड गर्दी उसळली. लोकांना धार्मिक महत्त्व असल्याने ठराविक घाटांवरच स्नान करायचे होते, त्यामुळे तिथे अधिक गर्दी झाली. यामुळे गर्दीच्या व्यवस्थापनात मोठी अडचण निर्माण झाली.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या या युगात एकाच वेळी उपस्थित असलेल्या लाखो लोकांची अचूक गणना करणे कठीण आहे. तरीसुद्धा, सरकारकडून कोट्यवधी लोकांच्या उपस्थितीचे आकडे जाहीर केले जातात. २०१० च्या हरिद्वार महाकुंभात उत्तराखंड सरकारने उपग्रह प्रतिमा वापरून ९ कोटी लोकांनी गंगा स्नान केल्याचा आकडा दिला होता. पण ही आकडेवारी नेमकी कितपत खरी होती, याबाबत संशय आहे. सरकारने अशा गर्दीचा आपल्या यशाचा मापदंड म्हणून स्वीकार केला असला तरी, इतक्या मोठ्या गर्दीच्या व्यवस्थापनासाठी अधिक दक्षता आवश्यक होती.

केवळ महाकुंभच नव्हे, तर चारधाम यात्रा, वैष्णोदेवी यात्रा आणि इतर धार्मिक कार्यक्रमांमध्येही गर्दीचा मोठा त्रास होताना दिसतो. २००० साली चारधाम यात्रेत १२,९२,४११ यात्रेकरू सहभागी झाले होते, तर २०२४ मध्ये हा आकडा ४५,४४,९७५ वर पोहोचला आहे. यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढत जाते. सरकार मोठ्या गर्दीला आपली उपलब्धी मानते, मात्र या गर्दीच्या व्यवस्थापनात नेहमीच अपयश येताना दिसते.

धार्मिक स्थळांवर गर्दीचा ताण मोठ्या प्रमाणावर पडतो. धार्मिक संस्था स्वतःच्या प्रसिद्धीसाठी मोठ्या संख्येने लोकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. यातून महसूलही मिळतो, त्यामुळे गर्दी वाढवण्याचा प्रयत्न केला जातो. पण यामुळे होणाऱ्या अपघातांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. तिरुपती, वैष्णोदेवी आणि इतर अनेक ठिकाणी याआधीही चेंगराचेंगरी झाली आहे. गेल्या वर्षी हाथरस येथे भोले बाबांच्या धार्मिक मेळाव्यात १२१ लोकांना आपला जीव गमवावा लागला. २०११ मध्ये हरिद्वारमधील शांतीकुंज येथे देखील अशीच दुर्घटना घडली होती.

या सर्व घटनांवरून एक गोष्ट स्पष्ट होते की, धार्मिक कार्यक्रमांमध्ये गर्दीच्या व्यवस्थापनावर अधिक भर द्यायला हवा. सरकार आणि धार्मिक संस्थांनी मिळून अशा कार्यक्रमांचे नियोजन अधिक प्रभावी पद्धतीने करायला हवे. गर्दी नियंत्रित न करता अधिकाधिक लोकांना आकर्षित करण्यावर भर दिला जातो, त्यामुळेच वारंवार अपघात होतात. भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले पाहिजे, अन्यथा अशा घटनांचे प्रमाण वाढतच जाईल. महाकुंभातील ही दुर्दैवी घटना हा एक इशारा आहे आणि या दुर्घटनेने पुन्हा एकदा गर्दी व्यवस्थापनाच्या अपयशावर मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे. श्रद्धेच्या उत्साहात जीव गमावणाऱ्यांचे दुःख शब्दात मांडता येणार नाही. सरकारने आणि प्रशासनाने यातून धडा घेत भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी अधिक काटेकोर उपाययोजना करायला हव्यात.

# दिल्ली निकालांनी दिला काँग्रेसला इशारा, बिहार-यूपीमध्ये आता नवा राजकीय रंग !

दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल समोर आले आहेत आणि त्यावर वेगवेगळ्या राजकीय गटांमध्ये चर्चा सुरू आहे. आम आदमी पक्षाने काँग्रेसशी युती केली असती आणि दोघांनी मिळून काही ठोस उपाययोजना आखल्या असत्या, तर कदाचित दिल्लीतील राजकीय समीकरण वेगळे दिसले असते. काँग्रेससाठी ही मोठी संधी होती, पण पक्षामध्ये असलेला गोंधळ आणि स्पष्ट रणनीतीचा अभाव यामुळे त्यांना मोठे नुकसान सहन करावे लागले. काँग्रेसमधील काही नेत्यांचे मत होते की पक्षाने स्वतंत्र लढाई लढली पाहिजे, ज्यामुळे त्यांची मतपेढी वाढू शकली असती. मात्र, ही मतपेढी वाढली असती तरी पक्षाला फारसा मोठा फायदा झाला नसता. काँग्रेस वर्षभर मेहनत करून योग्य दिशा ठरवू शकली नाही, त्यामुळे पक्षाच्या यशाबाबत अनिश्चितता कायम राहिली.

दिल्लीतील निवडणुकीत संदीप दीक्षित यांनी काँग्रेसच्या अपयशाची जाणीव करून दिली. त्यांनी त्यांच्या आईच्या पराभवाचा बदला घेतल्याचा दावा केला जातो. याच कारणामुळे नवी दिल्लीची जागा भाजपकडे गेली आणि अरविंद केजरीवाल यांना पराभव पत्करावा लागला. दुसरीकडे, अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा असलेल्या अलका लांबा यांची परिस्थिती अत्यंत निराशाजनक होती. जर आतिशी विजयी झाले असते, तर त्यांची मतपेढी आणखी वाढली असती. या निवडणुकीत पैसे, मनुष्यबळ आणि प्रचारतंत्राचा प्रभाव दिसून आला. काही विश्लेषकांचे मत आहे की, प्रियंका गांधींनी अधिक जोरदार प्रचार केला असता आणि रोड शो घेतले असते, तर काँग्रेसला काही जागा मिळू शकल्या असत्या. पण भाजपच्या स्लीपर सेलमुळे काँग्रेसला फारसा फायदा झाला नाही.

दिल्लीतील निवडणुकीत काँग्रेसच्या अनेक नेत्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. काही ठिकाणी भाजपचा विजय अत्यंत कमी मतांच्या फरकाने झाला. उदाहरणार्थ, काही जागांवर भाजपला केवळ काहीशे मतांनी विजय मिळाला, तर काही ठिकाणी आम आदमी पक्षाने मोठ्या फरकाने विजय मिळवला. जंगपुरा मतदारसंघात भाजपने ६००७५ मतांनी विजय मिळवला, तर काँग्रेसने ७३५० मते मिळवली. मालवीय नगरमध्ये भाजपने आम आदमी पक्षाचा २३१७८ मतांनी पराभव केला, तर काँग्रेसला फक्त ३४७४ मते मिळाली. दिल्लीच्या विविध भागांमध्ये मतांचे प्रमाण वेगवेगळे दिसून आले.

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांचे पुत्र संदीप दीक्षित आणि भाजपचे प्रवेश वर्मा यांच्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली. प्रवेश वर्मा यांनी ४८९८९ मतांनी विजय मिळवला. संदीप दीक्षित यांनी ४६५८ मतांची लीड घेतली होती, पण अंतिम निकालात भाजपला विजय मिळाला. काही राजकीय निरीक्षकांच्या मते, काँग्रेसच्या काही नेत्यांनी केजरीवालांना पाठिंबा दिला असता, तर निकाल वेगळे असू शकले असते.



निवडणूक प्रक्रियेतही काही महत्त्वाच्या बाबी दिसून आल्या. काही ठिकाणी आम आदमी पक्षाने १७ सी फॉर्म सार्वजनिक करून मतदारसंघातील मतदान आकडेवारी प्रदर्शित केली. यामुळे भाजपने काही ठिकाणी आक्षेप घेतला. महाराष्ट्रातील काही भागांमध्येही अशीच प्रक्रिया झाली होती. निवडणूक आयोगाने या मुद्द्यावर सखोल तपासणी केली आणि काही जागांवर फेरमतदानाची मागणी करण्यात आली.

दिल्लीतील निकाल पाहता, भाजपला काही ठिकाणी मोठा विजय मिळाला असला तरी आम आदमी पक्षानेही मोठ्या प्रमाणात जागा जिंकल्या. काँग्रेस मात्र या निवडणुकीत अस्तित्व टिकवू शकली नाही. त्यामुळे काँग्रेसला भविष्यात संघटनात्मक मजबुतीसाठी प्रयत्न करावे लागतील. पक्षाने केवळ निवडणुकीच्या काळात काम करून यश मिळवण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा, संपूर्ण वर्षभर आपली रणनीती मजबूत करावी लागेल.

काँग्रेसला सध्याच्या परिस्थितीत नव्याने विचार करावा लागेल. पक्षाने आपले नेतृत्व आणि कार्यपद्धती यामध्ये मोठे बदल केले नाहीत, तर भविष्यातील निवडणुकांमध्ये त्यांना आणखी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. तसेच, काँग्रेसने नवीन नेतृत्व विकसित करावे आणि जुन्या नेत्यांच्या अनुभवाचा योग्य प्रकारे उपयोग करावा. या निवडणुकीत काँग्रेसला मिळालेल्या अपयशामागे पक्षाच्या अंतर्गत गोंधळाला कारणीभूत धरले जात आहे.

आम आदमी पक्षाने दिल्लीमध्ये आपली सत्ता टिकवली असली तरी काँग्रेससाठी ही निवडणूक धडा घेण्यासारखी आहे. पंजाबमध्ये आम आदमी पक्षाचे सरकार असताना, त्यांनी दिल्लीतील निवडणुकीसाठी काही ठोस पावले उचलली. यामुळे काँग्रेसला देखील त्यांच्या आगामी निवडणुकांसाठी योग्य नियोजन करावे लागेल. काँग्रेसला जर पुन्हा दिल्लीच्या राजकारणात सक्रिय व्हायचे असेल, तर त्यांना नव्या रणनीतीसोबत मैदानात उतरावे लागेल. पक्षाला संघटनात्मक मजबुती देण्यासाठी आणि कार्यकर्त्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी त्वरित पावले उचलण्याची गरज आहे.

दिल्लीतील मतदारसंघात विविध पक्षांची ताकद वेगवेगळी होती. काही ठिकाणी आम आदमी पक्षाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून आला, तर काही ठिकाणी भाजपचा प्रभाव वाढताना दिसला. काँग्रेससाठी ही निवडणूक मोठी संधी होती, पण संघटनाच्या अभावामुळे त्यांना मोठे यश मिळवता आले नाही.

काँग्रेसने या निवडणुकीत अनेक चुका केल्या. राष्ट्रीय महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अत्यंत लाजिरवाण्या पराभवाला सामोऱ्या गेल्या. पक्ष संघटनेचा अभाव, नेत्यांमधील गोंधळ आणि कार्यकर्त्यांमध्ये असलेली नाराजी हे पराभवाची मुख्य कारणे ठरली. काँग्रेसच्या इतिहासात असे अनेक प्रसंग घडले आहेत, जेव्हा पक्षाने चुकीच्या निर्णयांमुळे मोठ्या संधी गमावल्या आहेत. शीला दीक्षित, एच.के. भगत, जे.पी. अग्रवाल यांसारखे जुने नेते निवृत्त झाल्यानंतर काँग्रेसमध्ये सक्षम नेतृत्वाचा अभाव जाणवू लागला आहे. त्यामुळे पक्षाला भविष्यात मोठे आव्हान उभे राहणार आहे. आता काँग्रेससमोर मोठे प्रश्न आहेत. पक्ष संघटना मजबूत करणे, कार्यकर्त्यांमध्ये एकजूट निर्माण करणे आणि योग्य रणनीती आखणे गरजेचे आहे. केवळ निवडणुकीच्या वेळी नव्हे, तर सातत्याने लोकांमध्ये राहून पक्षाची ताकद वाढवावी लागेल.

आम आदमी पक्षाने या निवडणुकीत मोठे धक्के अनुभवले आहेत, पण पंजाबमध्ये त्यांचे सरकार आहे. त्यामुळे दिल्लीतील पराभवाचा त्यांच्यावर किती परिणाम होईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने भविष्यात काय धोरण अवलंबायचे, यावरच त्यांच्या राजकीय भवितव्याचा निर्णय होईल. दिल्लीतील विधानसभा निवडणुकीचे निकाल हे स्पष्ट झाले आहे की, मतदार आता प्रस्थापित पक्षांऐवजी नव्या विचारधारेच्या पक्षांना संधी देत आहेत. काँग्रेसला जर भविष्यात पुन्हा एकदा आपली पकड मजबूत करायची असेल, तर त्यांना कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल करावे लागतील. अन्यथा, पक्षाचे अस्तित्व टिकवणे आणखी कठीण होईल.

**- विक्रम कदम -**

# जे अमेरिकेला जमते ते भारताला का जमत नाही ?

अमेरिकेत पुन्हा एकदा निवडून आलेले राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पदभार स्वीकारताच निर्णयांचा धडाका लावला. पहिल्याच दिवशी त्यांनी ४२ महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेत अपुऱ्या कागदपत्रांच्या आधारे राहणाऱ्या नागरिकांना पुन्हा मायदेशी पाठवण्याचा निर्णय हासुद्धा त्यापैकीच एक. त्यातील १०४ जणांची पहिली तुकडी नुकतीच भारतात दाखल झाली. अमेरिकेत जवळपास २० हजार भारतीय अपुऱ्या कागदपत्रांविना राहात आहेत. ट्रम्प यांच्या निर्णयाने हे सर्वच जण हवालदिल झाले आहेत. युएस इमिग्रेशन अँड कस्टमच्या इन्फोर्समेंटच्या आकडेवारीनुसार २०२४ च्या नोव्हेंबर मासापर्यंत देशात राहणाऱ्या २० हजार ४०७ भारतीयांना अमेरिकेने अवैध घोषित केले आहे. यांपैकी २४६७ भारतीय नागरिक इमिग्रेशन डिटेन्शन कॅम्प मध्ये बंद करण्यात आलेले आहेत. मेक्सिको आणि सल्वाडोर नंतर अमेरिकेत अवैधपणे राहणाऱ्यांमध्ये भारतीयांचा क्रमांक आहे. अमेरिकेत अवैधपणे राहणाऱ्या भारतीयांच्या रोजगारावर आणि एकूणच अस्तित्वावर संकट कोसळल्याने भारतातील नागरिकांना त्यांच्याविषयी सहानुभूती असली तरी त्यांनी तेथील कायदा मोडला आहे ही बाब सुद्धा दुर्लक्षून चालणार नाही. देशात अवैधपणे राहणाऱ्या परदेशी नागरिकांच्या विरोधात ट्रम्प यांनी घेतलेल्या कठोर निर्णयामुळे भारतीयांची मने दुखावली असली तरी अमेरिकन नागरिकांनी ट्रम्प यांच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. फ्रांस आणि इंग्लड या दोन्ही बलाढ्य देशांनी अन्य देशातील नागरिकांना देशात अवैधपणे वास्तव्य दिल्यामुळे त्याची विषारी फळे चाखली आहेत, त्या धर्तीवर ट्रम्प यांनी देशहितासाठीच हा निर्णय घेतल्याने त्यांच्या या निर्णयाचे स्वागत होत आहे. याउलट स्थिती आज भारतात दिसत आहे.

भारतात एनआरसी आणि सीएए कायदा लागू करण्यात येणार असल्याची घोषणा होताच देशातील एका समाजाने देशभर निदर्शने आणि आंदोलने सुरु केली. या समाजाच्या म्होरक्यांनी कायद्यांविषयी नीट जाणून न घेता लोकांमध्ये गैरसमज निर्माण करून लोकांची माथी भडकवण्याचे काम केले. 'आम्ही आमच्या नागरिकत्वाची कागदपत्रे दाखवणार नाही' असा एक सूर या समाजाकडून दिला गेला. विरोधी पक्षांनी आपल्या राजकीय स्वार्थासाठी आगीत तेल ओतण्याचे काम केल्याने या कायद्याद्वारे घुसखोरांवर कारवाई करणे सरकारलाही शक्य झाले नाही. असे असले तरी देशातील अवैध घुसखोरीविरोधात असलेल्या कायद्याचा वापर राज्यांतर्गत सुरक्षा विभागाकडून किती प्रमाणात केला जातो हे पाहणेही गरजेचे आहे.

भारत आणि बांगलादेश यामधील सुमारे २८०० किलोमीटर सीमेवर भारताने काटेरी तारांचे कुंपण बसवले आहे तरीही आजतागायत १० कोटीहून अधिक बांगलादेशी नागरिकांनी भारतात घुसखोरी केल्याचा अंदाज जाणकार वर्तवतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात घुसखोरी होत असताना सीमा सुरक्षा दलातील अधिकारी काय करत आहेत ? याचीही चौकशी होणे आज गरजेचे आहे. भारतातील मुस्लिमांची श्रद्धास्थाने असलेल्या मशिदी आणि दर्गे यांच्या उत्सवांच्या निमित्ताने भारतात येणाऱ्या बांगलादेशींपैकी अनेक जण पुन्हा त्यांच्या देशात जातच नाहीत असेही आता उजेडात आले आहे. लोकसंख्येच्या बाबतीत भारताने चीनला मागे टाकून जगात पहिला क्रमांक पटकावला ज्यामध्ये दुर्दैवाने बांगलादेशी घुसखोरांचाही महत्वाचा वाटा आहे. भारतातील गुन्हेगारी क्षेत्रातही बांगलादेशी घुसखोरांचा मोठ्या प्रमाणात भरणा आहे. भारतात राहून देशविरोधी कारवाया, अमली पदार्थांची तस्करी, दंगली घडवणे, लूटमार करणे, भूखंड बळकावणे, अनैतिक व्यवसाय यांसारख्या गुन्ह्यांमध्ये बांगलादेशी नागरिक पोलिसांच्या हाती सापडत आहेत. काही दिवसांपूर्वीच मुंबईत अभिनेता सैफ अली खान याच्यावर जीवघेणा हल्ला करणाराही बांगलादेशी गुंडच होता. झोपडपट्टी दादा, लोकप्रतिनिधी आणि दलाल यांच्या मदतीने या घुसखोरांच्या निवाऱ्याची आणि रोजगाराची सोय होते. काही दिवसांतच त्यांना बनावट मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड बनवून मिळते त्यामुळे बांगलादेशी असल्याचा संशय असूनही त्यांच्यावर कारवाई करणे पोलिसांना अवघड जाते. खरेतर बांगलादेशी नागरिकांची घुसखोरी रोखावी यासाठी विशेष शोधमोहीम प्रत्येक पोलीस ठाण्याअंतर्गत राबवण्यात यावी, असे पोलिसांना आदेश आहेत. यामध्ये बांगलादेशी व्यक्ती शोधणे, त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करणे, त्यांचे साथीदार शोधणे, तसेच त्या सर्वांना परत पाठवणे आदी कामे येतात; मात्र या सर्वांत अधिक वेळ जात असल्याने या आदेशाला पोलिसांकडूनच केराची टोपली दाखवली जात आहे. बांगलादेशात हिंदूंना वेचून त्यांचा छळ केला जात आहे, स्त्रियांवर अत्याचार होत आहेत, हिंदूंची मंदिरे फोडली जात आहेत आणि आपण मात्र देशाला पोखरणाऱ्या या बांगलादेशी घुसखोरांबाबत कोणतीही विशेष राबवत नाही आहोत. आतातर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनीही राज्यातील घुसखोरांविरोधात कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. घुसखोरांच्या विरोधात पोलिसांकडून राबवल्या जाणाऱ्या नरमाईच्या धोरणावर न्यायालयानेही ताशेरे ओढले आहेत. या सर्वांचा विचार करता आज जे अमेरिकेला जमते ते भारताला का जमू शकत नाही असा प्रश्न यानिमित्ताने नागरिकांकडून विचारला जात आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## 'व्हॅलेंटाईन वीक' की स्वैराचाराला मोकळीक ?

'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं !' असे मंगेश पाडगावकरांनी कवितेतून सांगितले असले तरी हल्लीच्या प्रेमात सुद्धा बरेच प्रकार तयार झाले आहेत. सकाम आणि निष्काम प्रेम हे त्यातील मुख्य प्रकार. आपल्यावर प्रेम आहे म्हणणारी व्यक्ती आपल्यावर निष्काम प्रेम करते कि त्यामागे तिचा काही हेतू दडला आहे हे ओळखणे आजच्या काळात अत्यावश्यक बनले आहे. प्रेमातील फसवणुकीची प्रकरणेही हल्ली वाढली आहेत. यामध्ये बऱ्याचदा बळी जातो तो मुलीचा. प्रेमात फसवणूक झाल्याने दरवर्षी कितीतरी मुलींचे आयुष्य उध्वस्त होते, तर कितीतरी जणी निराश होऊन मृत्यूला कवटाळतात. मुलींचे मनच मुळात भावनाशील असल्याने प्रेमात अशाप्रकारे वर्गवारी करणे प्रत्येकीला जमतेच असे नाही. मुलींच्या याच कमजोरीचा गैरफायदा घेणारे, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक करणारे, तिच्या भावनांशी खेळणारे राक्षसीप्रवृत्तीची माणसे आज चोहोबाजूंनी पसरलेली आहेत, त्यामुळे आता मुलींना प्रेमात आंधळे होणे परवडणारे नाही.

काहीजण म्हणतील प्रेम केले जात नाही, तर ते आपसूकच होते. असे असेल, तर दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या सात दिवसांत तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा 'व्हॅलेंटाईन वीक'चा उहापोह कशासाठी ? हा सप्ताह नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा ? 'व्हॅलेंटाईन वीक'च्या स्वागतासाठी भेटवस्तूंची दुकाने मागील तीन-चार दिवसांपासून सजली आहेत, वृत्तवाहिन्यांतून सौंदर्य तज्ज्ञांना निमंत्रित करून 'व्हॅलेंटाईन वीक'साठी मुलींनी कशा प्रकारे तयारी करावी याबाबतच्या 'टिप्स' दिल्या जात आहेत. 'कॉलेज कॅम्पस'मध्ये सुद्धा सध्या याच विषयाची चर्चा रंगलेली दिसून येते. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे उलटली. मात्र त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीच्या जोखडातून आपण अद्याप मुक्त झालो नसल्याचा प्रत्यय दर वर्षी 'व्हॅलेंटाईन वीक' सुरु झाला कि येऊ लागतो. 'व्हॅलेंटाईन डे'ची 'क्रेझ' जेव्हढी भारतात पाहायला मिळते तेव्हढी अन्य पाश्चिमात्य देशांमध्ये खचितच असावी. ७ फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत विविध 'डेज' भारतासारख्या संस्कृतीप्रिय राष्ट्रात तरुण तरुणींकडून उत्साहाने साजरे केले जातात.शहरातील ही 'क्रेझ' हळूहळू ग्रामीण भागातही पसरू लागली आहे. मातृभाषेला डावलून इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा वाढत चाललेला कल हेच यामागील प्रमुख कारण असावे.




या दिवसांत अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात शैक्षणिक वातावरण बिघडवणाऱ्या घडामोडी घडत असतात. परीक्षेच्या तयारीच्या दिवसांत काही चंगळवादी युवक युवतींची भलतीच तयारी सुरु असते. ज्याचा परिणाम शाळा महाविद्यालयांतील अन्य विद्यार्थीवर्गावर होत असतो. अनेक ठिकाणी शाळा-महाविद्यालय प्रशासनही या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते याचे खरेतर नवल वाटते. या दिवसांत 'डेज'च्या निमित्ताने पालकांच्या पैशांची तरुणांकडून मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली जाते. या ७ दिवसांमध्ये गर्भनिरोधक साधनांचा खपही वाढत असल्याचे एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. असल्या विदेशी भोगवादी दिवसांच्या मौजमजेमध्ये काडीमात्र रुची नसणाऱ्या अनेक मुलींना या 'डेज'चा कमालीचा मनस्ताप होतो. 'रोज डे', 'प्रपोझ डे', 'प्रॉमिस डे', 'किस डे', 'हग डे', 'चॉकोलेट डे' आणि 'व्हॅलेंटाईन डे' यांसारख्या डेजच्या निमित्ताने किशोरवयीन मुलींवर घातला जाणारा दबाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर घातक परिणाम करतो. कितीतरी मुली या दिवसांत वासनांधांच्या खोट्या प्रेमाला भुलतात आणि आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतात. लव्ह जिहादची प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यातून वाढू लागली आहेत. अशांसाठी हे डेज म्हणजे 'इप्सित साध्य करण्यासाठी मिळालेली पर्वणीच असते. प्रेमाला भारतीय संस्कृतीने नेहमीच पवित्र आणि उच्च स्थान दिले आहे; मात्र प्रेमाच्या नावाखाली घातला जाणारा बाजार आणि चालणारा स्वैराचार आपल्या संस्कृतीला नक्कीच शोभणारा नाही. भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा 'व्हॅलेंटाईन वीक' आपल्या देशात हवा तरी कशाला ?

### सण असताना डेज कशाला ?

व्हॅलेंटाईन वीकला सुरुवात झाल्याने समस्त गिफ्ट शॉप्स रंगीबेरंगी भेटवस्तूंनी सजली आहेत. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे झाली; मात्र त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीच्या जोखडातून आपण अद्याप मुक्त झालो नसल्याचीच ही चिन्हे आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. व्हॅलेंटाईन डेची क्रेझ जेव्हढी भारतात पाहायला मिळते तेव्हढी अन्य पाश्चिमात्य देशांमध्ये क्वचितच असावी. ७ फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत विविध डेज भारतासारख्या संस्कृतीप्रिय राष्ट्रात त्यातही खासकरून शहरांसारख्या ठिकाणी तरुण तरुणींकडून उत्साहाने साजरे केले जातात. मातृभाषेला डावलून इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा वाढत चाललेला कल हेच यामागील प्रमुख कारण आहे.

या दिवसांत डेजच्या निमित्ताने पालकांच्या पैशांची तरुणांकडून मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली जाते. असल्या विदेशी भोगवादी दिवसांच्या मौजमजेमध्ये काडीमात्र रुची नसणाऱ्या अनेक मुलींना या डेजचा कमालीचा मनस्ताप होतो. रोज डे, प्रपोझ डे, प्रॉमिस डे, किस डे, हग डे, चॉकोलेट डे आणि व्हॅलेंटाईन डे यांसारख्या डेजच्या निमित्ताने किशोरवयीन मुलींवर घातला जाणारा दबाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर घातक परिणाम करतो. अशा डेजच्या माध्यमांतून स्वैराचाराला प्रोत्साहन मिळते. प्राचीन हिंदू संस्कृतीने आपल्याला सण उत्सवांचे भांडार उपलब्ध करून दिले असताना भारतीय संस्कृतीवर आघात करणारी आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारी ही डेज नावाची विकृती आपल्या देशात हवी तरी कशाला ?

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग)** : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : अ‍ॅड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : अँड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय, कोपार्डे, जि.कोल्हापूर महाराष्ट्र-४१६२०४, येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठौर, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोनः (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अर्पाटमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क कार्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगरए ठाणे (वेस्ट)४००६०४

## थोडक्यात



### मत्स्य विभागाकडून १६ नौकांवर कारवाई

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

अनधिकृतरित्या मच्छिमारी करणाऱ्या नौकांवर लक्ष ठेवण्यासाठी राज्य सरकारने ड्रोनद्वारे पाळत ठेवण्याचे काम सुरू केले आहे. यामध्ये आतापर्यंत १६ नौकांवर कारवाई झाली असून त्यापैकी ४ नौकांना ४ लाख ८० हजार रुपयांचा दंड करण्यात आला आहे. मत्स्य व्यवसाय खात्याच्या अधिकृत सूत्रांनी माहिती दिली की, रत्नागिरी परिसरात अनधिकृत मासेमारी करताना आतापर्यंत १६ नौकांवर कारवाई झाली आहे.

### सलूनमध्ये घुसून मारहाण

**राजापूर । प्रतिनिधी**

सलूनमध्ये घुसून तरुणाला जोरदार मारहाण करून त्याचे डोके फोडून रक्तबंबाळ केल्याची घटना गुरुवारी सायंकाळी राजापूर शहरातील चव्हाणवाडी येथे घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,सुरज पुरुषोत्तम चव्हाण (३०, रा. राजापूर, चव्हाणवाडी) असे जखमी तरुणाचे नाव आहे. या मारहाणीप्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. संतोष रवींद्र गुरव उर्फ साहिल (२२), आयुष संतोष गुरव (२१, दोघेही रा. धोपेश्वर-गुरववाडी, राजापूर) असे गुन्हा दाखल केलेल्या दोघांची नावे आहेत. सुरज चव्हाण हा सलूनमध्ये गुरुवारी सायंकाळी ७:३० च्या सुमारास काम करत होता. यावेळी अचानक दोन तरुण सलूनमध्ये घुसले आणि त्यांनी सुरज याला जोरदार मारहाण केली. एकाने हातातील कड्याने सुरज याच्या डोक्यात प्रहार केला. यामध्ये सुरजच्या पाठीमागील बाजूला दुखापत झाली. या मारहाणीनंतर दोघेही पळून गेले. सुरज याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, डोक्यावर ६ टाके टाकण्यात आले आहेत. सुरज याने पोलिस स्थानकात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी या तरुणांचा शोध घेतला असता दोघे धोपेश्वर येथील असल्याचे समजले. या दोघांनाही पोलिसांनी ताब्यात घेत त्यांच्यावर मारहाणीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### झाडावरून पडलेल्या वृद्धाचा मृत्यू

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील डेरवण येथील मठाच्या बाजूस असलेल्या जंगलात तोडणीसाठी गेलेल्या वृद्धाचा झाडावरून पडल्याने मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी सकाळी ९.५० वाजता घडली. याबाबत सावर्डे पोलिस स्थानकात आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी धोंडु महाडीक (६९, डेरवण, गवळवाडी, चिपळूण) असे मृत्यू झालेल्या वृद्धाचे नाव आहे. शिवाजी महाडीक हे डेरवण मठाच्या मागील बाजूस असलेल्या जंगलात झाडावर चढून कवळ तोडणीचे काम सुरू असतानाच पाय घसरुन ते जमिनीवर कोसळले. यामध्ये त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

### उदय सामंत नागरिकांच्या समस्या जाणून घेणार

**मुंबई । वृत्तसंस्था**

शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार सर्व सामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सोमवारी बाळासाहेब भवन, मुंबई येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. यासाठी उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत हे उद्या सोमवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत नागरिकांच्या समस्या जाणून घेण्याकरिता उपस्थित राहणार आहे. सर्व नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कांदळगाव श्री देव रामेश्वर देवस्थानचा ‘वेशी फिरणे’ कार्यक्रमाची उत्साहपूर्ण सुरवात

**मालवण । वार्ताहर**

तालुक्यातील कांदळगाव येथील श्री देव रामेश्वर देवस्थानचा पूर्वापार परंपरेनुसार स्वयंभू देव रामेश्वर पालखी, तरंग, राणे - परब मानकरी व रयत मंडळीसह ‘वेशी फिरणे’ कार्यक्रम ( २०२५) ला ९ फेब्रुवारी रोजी दुपारपासून सुरुवात झाली. कांदळगाव येथील रामेश्वर मंदिर येथून श्री देव रामेश्वराने पालखीत बसून देव तरंग, राणे - परब व रयतेसह वेशी फिरणे कार्यक्रमासाठी प्रस्थान केले. देवाच्या स्वागतासाठी कांदळगाव - ओझर - कोळंब मार्गावर भाविकांनी भव्य रांगोळ्या काढल्या होत्या आणि रस्त्याच्या दुतर्फा भगवे ध्वज फडकवत गुढ्या देखील उभारल्या होत्या.

श्री देव रामेश्वर मंदिरातून प्रस्थान केल्यावर भाविकांनी संपूर्ण मार्गावर ठिकठिकाणी स्वागत केले. श्री देव रामेश्वर ओझर नाक्यावर दाखल झाल्यावर त्याठिकाणी भाविकांकडून उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले. त्यानंतर कोळंब खडवण नाका येथे भाविकांकडून भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित शेकडो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. या दरम्यान ओझर येथे डंपर व वाळू व्यावसायिकांच्या वतीने भाविकांना शीतपेय, लाडू आणि अल्पोपहाराचे वाटण्यात आला.

सायंकाळी श्री देव रामेश्वर कोळंब मांगरी येथे भेटीस आल्यानंतर भाविकांकडून स्वागत करण्यात आले. या सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. देवस्थान ट्रस्ट पदाधिकारी, विश्वस्त सदस्य, राणे - परब मानकरी व कांदळगाव ग्रामस्थ सहभागी झाले.

सोहळ्यात उद्या दि. १० फेब्रुवारी रोजी कोळंब मांगरी येथील देव महापुरुष येथे दुपारी महाप्रसाद, दुपारनंतर न्हिवे येथे प्रस्थान करणार आहे. दि. ११ रोजी न्हिवे येथे दुपारी महाप्रसाद, दुपारनंतर महान येथे प्रस्थान, १२ रोजी दुपारी महान गांगेश्वर मंदिर येथे महाप्रसाद, दुपारनंतर कांदळगाव रवळनाथ मंदिरकडे प्रस्थान, १३ रोजी सकाळी रवळनाथ मंदिरातून कांदळगाव साळकरवाडी येथे प्रस्थान, तेथून पुन्हा माघारी येताना परबवाडी मोठ्या तुळशीजवळ महाप्रसाद, दुपारनंतर रवळनाथ मंदिराकडे प्रस्थान, १४ रोजी रवळनाथ मंदिर येथून राणेवाडी येथे प्रस्थान, दुपारी राणेवाडी मध्यवर्ती मोठी तुळस येथे महाप्रसाद, दुपारनंतर रामेश्वर मंदिर येथे रवाना, रात्री रामेश्वर मंदिर येथे पाच दिवसीय वेशी फिरणे कार्यक्रमाची रितीरिवाजानुसार सांगता करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित रहायचे आवाहन कांदळगाव रामेश्वर देवस्थान तर्फे करण्यात आले आहे.





# रिगल कॉलेजची विद्यार्थीनी एस.एन.डी.टी विद्यापिठात प्रथम



**कणकवली । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष एप्रिल २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या तृतीय वर्ष बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन ची विद्यार्थीनी कु. साक्षी विनायक चौंबे हिने एस.एन.डी.टी विद्यापीठात प्रथम क्रामांक मिळविला. तसेच कांता ढेपे यांच्याकडून गोल्ड मेडल देण्यात आले. तसेच कु.सुचिता राणे हिने तृतीय वर्ष बी.सी.ए मध्ये एस.एन. डी.टी विद्यापिठात चतुर्थ क्रमांक पटकावला.

कु. साक्षी विनायक चौंबे हिचे प्राथमिक शिक्षण साकेडी प्राथमिक शाळा येथे तर १०वी व १२वी चे शिक्षण एस.एम. हायस्कूल कणकवली येथे पूर्ण करून पुढील शिक्षणासाठी रिगल कॉलेज कणकवलीमधील एस.एन.डी.टी विद्यापीठ बी.सी.ए अभ्यासक्रमला प्रवेश घेतला. तीन वर्षाच्या कोर्समध्ये तिने तृतीय वर्षातील एस.एन.डी.टी विद्यापीठाच्या २०२३ -२४ मध्ये झालेल्या सेमिस्टरमध्ये १००० गुणांपैकी ८३८ गुण मिळवुन ० ग्रेड प्राप्त करून विद्यापिठात प्रथम क्रमांकासह मोल्ड मेडल पटकावले. ग्रामीण भागात शिक्षण घेऊन तिने कठोर परिश्रम करून उल्लेखनिय कामगिरी करून दाखविली. कु. सुचिता देविदास राणे हिने १०वी व १२वी चे शिक्षण खानापूर बेळगाव येथे झाले. पुढील शिक्षणासाठी रिगल कॉलेज कणकवलीमधील एस.एन.डी.टी विद्यापिठाच्या बी.सी.ए अभ्यासक्रमाला चतुर्थ क्रमांक पटकावला.

रिगल कॉलेज कणकवलीच्या शैक्षणिक क्षेत्रात एक मानाचा तुरा एस.एन.डी.टी विद्यापिठात रोवल्याने तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. विद्यापिठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव तसेच परीक्षा विभाग प्रमुख संतय नेरकर सर यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले. रिगल एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन संजयराव शिर्के सर तसेच संचालिका सुमिता शिर्के यांनी तिचे संस्थेतर्फे अभिनंदन केले.

# भारतीय मजदूर संघ संघटित, असंघटिक कामगारांच्या पाठीशी

**मालवण । वार्ताहर**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संघटित, असंघटिक क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय मजदूर संघास सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. तसेच जिल्ह्यातील घरेलू कामगारांना शासन आदेशानुसार संसार उपयोगी भांडी संच मिळावा यासाठी प्रयत्न केला जाईल असे, मत्स्योद्योग व बंदर विकास मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्हा पालकमंत्री नितेश राणे यांनी भारतीय मजदूर संघाच्या सिंधुदुर्ग जिल्हा प्रतिनिधींना अश्वासित केल्याची माहिती जिल्हा सचिव हेमंतकुमार परब यांनी दिली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संघटित, असंघटिक क्षेत्रातील कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात मत्स्योद्योग व बंदर विकास मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्हा पालकमंत्री नितेश राणे यांची आज ओम गणेश निवास कणकवली येथे भारतीय मजदूर संघाच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन चर्चा केली. यावेळी भारतीय मजदूर संघाचे प्रदेश सचिव हरी चव्हाण, कोकण विभाग संघटनमंत्री भगवान साटम, जिल्हा सचिव हेमंतकुमार परब व जिल्हा कोषाध्यक्ष ओमकार गुरव उपस्थित होते.



जिल्हा पालकमंत्री नितेश राणे

महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याणकारी मंडळ अंतर्गत नोंदीत असलेल्या घरेलू कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार अनेक जिल्ह्यात संसार उपयोगी भांडी संचाचे वाटप करण्यात आले आहे. मात्र सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ऑगस्ट २०२४ अखेर पर्यत १,४९५ एवढे घरेलू कामगार आजही भांडी संच्यापासून वंचित असल्याचे पालकमंत्री यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच बांधकाम कामगारांचे प्रलंबित लाभ प्रस्ताव, कंत्राटी कामगार कायद्याची अमंलबाजावणी, अशा प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा करून न्याय मिळवून देण्यासाठी पालकमंत्री यांना विनंती करण्यात आली असता, पालकमंत्री नितेश राणे यांनी संघटित,असंघटिक क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय मजदूर संघास सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे अश्वासित केल्याची माहिती जिल्हा सचिव.श्री परब यांनी दिली.

# छत्तीसगड-महाराष्ट्र सीमेवर सर्वात मोठी चकमक; ३१ नक्षलवाद्यांचा खात्मा, २ जवान शहीद

**बिलासपूर । वृत्तसंस्था**

छत्तीसगड-महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर बीजापुर जिल्ह्यात सुरक्षा दलाचे जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये तीव्र चकमक सुरू आहे. रविवारी सकाळपासून ही चकमक सुरू आहे. हाती आलेल्या माहितीनुसार या कारवाईत ३१ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला असून २ जवान शहीद झाले आहेत त्याचबरोबर या कारवाईत २ जवान जखमी झाले आहेत.



नक्षलवाद विरोधी मोहिमेत सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात झालेल्या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार झाले आहेत. डीआरजी आणि एसटीएफच्या कारवाई दरम्यान २ जवान शहीद झाले, तर २ जवान जखमी झाले आहेत. अलीकडच्या काळातील ही सर्वात मोठी कारवाई असल्याचे बोलले जात आहे, ज्यात एवढ्या मोठ्या संख्येने नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. केंद्र सरकारने ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्याची घोषणा केली आहे. छत्तीसगडमध्ये अलीकडच्या काळात डझनभर माओवादी मारले गेले आहेत. विजापूर-नारायणपूर सीमेजवळ ही चकमक झाली. दोन्ही बाजूंनी जोरदार चकमक झाली ज्यात मोठ्या संख्येने नक्षलवादी ठार झाले. आयजी बस्तर पी सुंदरराज यांनी सांगितले की, आतापर्यंत ३१ मृतदेह सापडले आहेत. मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांची संख्या वाढू शकते. या चकमकीत २ जवान शहीद झाले, तर २ जवान जखमी झाले. घटनास्थळावरून स्वयंचलित शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत.

**अनेक तास चालली चकमक**

बस्तर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बिजापूरच्या राष्ट्रीय उद्यान परिसरातील जंगलात सुरक्षा दल आणि नक्षलवादी यांच्यात चकमक झाली. रविवारी सकाळी झालेल्या या चकमकीत मोठ्या संख्येने नक्षलवाद्यांना घेरण्यात आले. ही चकमक अनेक तास चालली. सुरुवातीला १२ नक्षलवादी ठार झाल्याची माहिती होती, मात्र सर्च ऑपरेशननंतर जंगलात मृतदेह सापडले. एकूण ३१ माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला. गेल्या आठवड्यात छत्तीसगड-ओडिशा सीमेवर झालेल्या चकमकीत १६ माओवाद्यांना ठार करण्यात आले होते. यामध्ये ९० लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या चलपतीचाही समावेश होता.

# कणकवलीत विश्वकर्मा जयंती उत्सव कार्यक्रम

**कणकवली । प्रतिनिधी**

कणकवली शहरातील सुतारवाडी येथील समाज बांधवांच्यावतीने सोमवार १० फेब्रुवारी रोजी विश्वकर्मा जयंती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सकाळी १० वा. पासून मूर्तीचे वाजत गाजत आगमन, अभिषेक, आरती, तीर्थप्रसाद दुपारी १ वाजता महाप्रसाद, ३ वाजल्यापासून हळदीकुंकू रेकॉर्ड डान्स स्पर्धा, स्थानिक भजने, रात्री ९.३० वाजता उभादांडा- वेंगुर्ला येथील पार्सेकर यांचे महान पौराणिक दशावतारी नाटक सादर होणार आहे. तरी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन कणकवली मधलीवाडी (सुतारवाडी) येथील विश्वकर्मा जयंती उत्सव मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे


# कोकणातील सातही जिल्ह्यांत समुद्रकिनारी बांधकामावर बंदी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅन तयार न करणे मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग आदी सात जिल्ह्यांचे जिल्हा प्रशासन व एमसीझेडएमएच्या (महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी) अंगलट आले आहे. या सातही जिल्ह्यांत कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅनशिवाय एकाही बांधकामाला परवानगी देण्यात येऊ नये, असे आदेश राष्ट्रीय हरित लवादाने संबंधित प्राधिकरणांना दिले आहेत.

आधी कॉस्टल झोन प्लॅन आणा आणि मगच वीट रचा, असे फटकारे लवादाने लावल्यामुळे शासकीय गोटात एकच खळबळ उडाली आहे. हा प्लॅन तयार करण्याचे आदेश केंद्र सरकारने २५ वर्षांपूर्वी दिले होते. मात्र तो तयार न झाल्याने या सातही जिल्ह्यांतील समुद्र किनाऱ्यालगत होणाऱ्या बांधकामांवर आता बंदी आली आहे. कोस्टल झोन मधील सातही जिल्ह्यांत विविध शासकीय विभागांकडून सुरू असलेल्या मनमानी कारभाराला पायबंद घालण्यासाठी येथील पारंपरिक मच्छीमार बचाव सामाजिक कृती समितीने राष्ट्रीय हरित लवादाकडे २०२४ मध्ये याचिका दाखल केली आहे. सातही जिल्ह्यांचे गाव नकाशे तयार करणे, मढ प्लॉट, पारंपरिक मासेमारी क्षेत्र, माशांच्या प्रजननाच्या जागा निश्चित करून संरक्षण देणे, राज्यातील सातही सागरी जिल्ह्यांत कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅनशिवाय एकाही विकासकामांना (अत्यावश्यक सेवा वगळता) परवानगी देण्यात येऊ नयेत असे सक्तीचे आदेश राष्ट्रीय हरित लवादाने जिल्हाधिकारी, एमसीझेडएमएच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

त्यामुळे या जिल्ह्यातील विविध नियोजित बांधकाम प्रकल्प लटकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबवणे आदी मागण्या या याचिकेत करण्यात आल्या आहेत. या याचिकेवर पुण्यातील राष्ट्रीय हरित लवादाच्या खंडपीठासमोर मंगळवारी सुनावणी झाली. या सुनावणीत या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासकीय विभागाची न्यायालयाने कानउघाडणी केली. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर,रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे राज्यातील सात जिल्हे कोस्टल झोनमध्ये मोडतात. कोस्टल झोनमधील सातही जिल्ह्यांचे कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅन तयार करण्यासाठी केंद्र सरकारने कोट्यवधींचा निधी खर्च केला आहे.



कोस्टल झोनमधील सातही २ जिल्ह्यांचे कोस्टल मॅनेजमेंट प्लॅन २५ वर्षांनंतरही तयार झालेले नाहीत. याचे विपरित परिणाम होऊ लागले आहेत. सात कोस्टल जिल्ह्यांतील गावांचे नकाशेच अस्तित्वात नसल्याने लाखो पारंपरिक मच्छीमारांची परवड झाली आहे.

राज्यातील विविध २ शासकीय विभागांनी बड्या कंपन्या, भांडवलदारांच्या हितासाठी पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे. याची गंभीर दखल घेऊन यापुढे राज्यातील सातही सागरी जिल्ह्यात कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅनशिवाय एकाही विकासकामांना परवानगी देण्यात येऊ, अशी भूमिका लवादाने घेतली आहे.

**सिडकोने घेतला गैरफायदा**

गावनिहाय नोंदीच नसल्याने सिडकोने तर याचाच मोठ्या प्रमाणावर गैरफायदा घेऊन उरण, पनवेल, नवी मुंबई परिसरातील हजारो हेक्टर जमिनी विविध प्रकल्प, कंपन्या व भांडवलदारांच्या घशात घालून अब्जावधींचा नफा कमावला आहे. मात्र स्थानिक पातळीवरील पारंपरिक मच्छीमारांचे हित जोपासण्यात आणि पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी सर्वच शासकीय यंत्रणा सपशेल अपयशी ठरलेल्या आहेत. शासकीय यंत्रणांच्या दुर्लक्षपणाचे दुरगामी परिणाम आता स्पष्टपणे दिसू लागले असून यावर लवादाने नाराजी व्यक्त केली आहे.

# राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत कु. प्रणव गवस प्रथम




**बांदा । वार्ताहर**

राज्यस्तरीय शालेय स्पर्धा अकोला येथे संपन्न झाल्या आहेत. यामध्ये शालेय पॉवरलिफ्टिग स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील वयोगटात कु.प्रणव भिकाजी गवस याने ६६ किलो वजन उचलत प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत, जिल्हा क्रिडा परीषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या विद्यमाने राज्यस्तरीय शालेय पॉवरलिफ्टींग स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत जिल्हयांतून ११ स्पर्धक सहभागी झाले होते.

# मुलीसाठी शेवटपर्यंत लढले, पण श्रद्धा वालकरच्या वडिलांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**मुंबई । वृत्तसंस्था**

श्रद्धा वालकर हिचे वडील विकास वालकर यांचे निधन झाले आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, विकास वालकर यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यानंतर त्यांचे निधन झाले. आपली पोटची मुलगी श्रद्धा हिच्या निर्घृण हत्येनंतर विकास वालकर यांना एक मोठा धक्का बसला होता. मुलगी श्रद्धा हिच्या शरीराचे अनेक तुकडे करुन हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात आरोपीला अटक केली आहे. आपल्या मुलीला न्याय मिळावा यासाठी विकास वालकर हे लढाई लढत होते.

मुलगी श्रद्धा वालकरची २०२२ मध्ये हत्या करण्यात आली होती. आरोपी आफताब पूनावाला याने श्रद्धाच्या मृतदेहाचे ३६ तुकडे करुन जंगलात फेकून दिले होते. या प्रकरणात श्रद्धाच्या मृतदेहाचे अवशेष हे पुरावे असल्याने ते पोलिसांकडे आहेत. आपल्या मुलीच्या हत्येनंतर विकास वालकर यांना मोठा धक्का बसला होता आणि ते खूपच दु:खी होते. तिच्या अंत्यसंस्कारासाठी मृतदेहाचे उर्वरित अवशेष मिळण्याची वाट ते पाहत होते. वसईत राहणारी श्रद्धा आफताब पूनावाला याच्या संपर्कात आली.



मात्र, आफताबसोबतच्या तिच्या नात्याबद्दल कुटुंब खूश नव्हते. यामुळे कुटुंबाचा श्रद्धासोबत संपर्क नव्हता. श्रद्धाच्या काही मित्रांनी तिच्या वडिलांना सांगितले की, अडीच महिन्यांहून अधिक काळ श्रद्धासोबत आमचा संपर्क झाला नाही. ही माहिती मिळाल्यावर विकास यांनी आपली मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार मुंबई पोलिसांत केली. या प्रकरणाचा तपास करत असताना श्रद्धा आपल्या लिव्ह ईन पार्टनर आफताब पूनावाला याच्यासोबत दिल्लीत राहत असल्याची माहिती समोर आली.

यानंतर दिल्ली पोलिसांनी तपास केला असता श्रद्धाची हत्या करुन तिच्या मृतदेहाचे तुकडे केल्याचं समोर आलं. दिल्ली पोलिसांनी श्रद्धाचा शोध सुरू केला आणि आफताबला त्याच्या मेहरौली येथील भाड्याच्या फ्लॅटमधून अटक केली. पोलिसांनी फ्लॅटमधील रेफ्रिजरेटरमधून श्रद्धाच्या शरीराचे उर्वरित तुकडे, रक्ताचे डाग आणि इतर पुरावे जप्त केले. चौकशीदरम्यान आफताबने आपला गुन्हा कबूल केला.

२०२२ मध्ये दिल्लीतील मेहरौली येथे श्रद्धा वालकर नावाच्या तरुणीची हत्या करण्यात आली होती. श्रद्धा वालकरच्या मृतदेहाचे ३६ तुकडे आरोपीने केले होते. आरोपीने श्रद्धाच्या मृतदेहाचे अवयव मेहरौलीच्या जंगलात फेकून दिल्याचं उघड झालं होतं. या घटनेने केवळ दिल्लीच नाही तर संपूर्ण देश हादरला होता. श्रद्धा वालकरची निर्घृणपणे हत्या करणारा आरोपी आफताब पूनावाला हा अटकेत असून दिल्लीतील तिहार तुरुंगात आहे.

# राजापुरात खेळत असताना बुडणाऱ्या बालकास आठ वर्षाच्या मुलाने वाचवले

**राजापूर । प्रतिनिधी**

राजापूर तालुका बार असोसिएशनचे ६वे स्नेह संमेलन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एका रिसॉर्टमध्ये पार पडले. या स्नेहसंमेलनात राजापुरातील सर्व वकील कुटुंबांसमवेत सहभागी झाले होते. सायंकाळी कार्यकम सुरू असताना त्यांच्यासोबत गेलेली सर्व लहान मुले एका बाजूला खेळत होती. या मुलांपैकी ॲड. अभिषेक ढवळे यांचा सहा वर्षांचा मुलगा रूद्र आणि ॲड. सुशांत पवार यांचा आठ वर्षांचा मुलगा नील खेळत खेळत जवळच असलेल्या स्विमिंगपुलाजवळ गेले. स्विमिंग पुलाच्या काठावर बसून पाण्यात चेंडू तसेच पोहण्याची ट्यूब टाकत असताना रूद्र याचा अचानक तोल गेला आणि तो स्विमिंगपूलमध्ये पडला. तसा तो पाण्यात गटांगळ्या खाऊ लागला. या वेळी नील याने क्षणाचाही विलंब न लावता काठावरून रूद्र याला हात देत पाण्याबाहेर खेचले. ज्या ठिकाणी ही घटना घडली त्या ठिकाणी रूद्र आणि नील या दोघांव्यतिरिक्त कोणीही नव्हते. त्यांना जेव्हा ही घटना समजली तेव्हा त्यांचासुद्धा थरकाप उडाला. नील याच्या वयाचा विचार करता रूद्र पाण्यात पडल्यानंतर तो देखील घाबरून तेथून पळून गेला असता तर मोठा अनर्थ घडला असता; मात्र नील याने समयसूचकता दाखवत अत्यंत धाडसाने रूद्र याला पाण्याबाहेर काढत जीवदान दिले आहे.